# राधाकृष्णन् सारखा आदर्श अंगी बाळगा . महापौर नंदा जिचकार




**मनपाच्या तीन शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' उल्लेखनीय कामगिरीबद्दल १२ शिक्षकांचा गौरव**

शिक्षकांनी सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा आदर्श आचरणात आणावा. त्यांच्यासारखे आपले चरित्र असावे याचा प्रयत्न करावा. आपल्या आचरणातूनच विद्यार्थ्यांवर संस्कार घडतात व विद्यार्थी घडत असतो, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे शिक्षक दिन समारंभ मंगळवारी (ता.५) विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक सभागृहात पार पाडला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर शिक्षक परिषदेचे आमदार नागो गाणार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने, स्थापत्य व प्रकल्प समिती सभापती संजय बंगाले, धरमपेठ झोन सभापती रूपा राय, मनपातील भाजपच्या प्रतोद दिव्या धुरडे, शिक्षण समिती सदस्य राजेंद्र सोनकुसरे, उज्ज्वला बनकर, प्रमिला मंथरानी, नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेविका उज्ज्वला शर्मा, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष राजेश गवरे प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, महानगरपालिकेच्या विद्यार्थांना घडविण्यात मनपाच्या शिक्षकांचे योगदान शंभर टक्के आहे. त्याबद्दल मी त्यांचे प्रथम कौतुक करते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घडविताना शालेय शिक्षणाबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजे. आज मनपाच्या शाळांची अवस्था बिकट आहे. त्याचा दर्जा सुधारण्यात शिक्षकांची भूमिका ही महत्त्वाची आहे. महानगरपालिकेचे नाव कसे उंचावेल यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजे. मनपाच्या शाळांचे नाव देशातील पहिल्या १० शाळांमध्ये यावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न आहे. ते स्वप्न नक्कीच पूर्ण करण्याचा प्रयत्न मनपाचे शिक्षक करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिक्षक परिषदेचे आमदार नागो गाणार म्हणाले, मी मनपाच्या शाळेमुळेच घडलो. माझी ओळख निर्माण करून देण्यात मनपाच्या शाळेचे योगदान मोलाचे आहे. शिक्षण विभागाच्या झालेल्या दुर्दशेवर नुसतीच चर्चा न करता त्याला कसे सुधारता येईल यासाठी प्रयत्न करा, असा सल्ला त्यांनी यावेळी बोलताना दिला. सध्या खासगी शाळेचे वाढते प्रस्थ हे

आपल्यासमोरील आव्हान आहे. त्या आव्हांनाना पेलत शिक्षकांनी आपले कर्तव्य पार पाडत आपल्यावरची जबाबदारी निष्ठेने पार पाडावी. असे केल्यास मनपाच्या शाळांचे स्थान नक्कीच उंचावेल असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे यांनी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने घेतलेले कष्ट हे खरंच दखल घेण्याजोगे आहे. मनपाच्या शाळांचे नाव उंचावण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असल्याचे सांगितले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून प्रसंगी मनपाच्या संजयनगर हिंदी माध्यामिक शाळेचे सुधाकर आमधरे, मनिषा मोगलेवार, अशोक चौधरी यांना ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल १२ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सन् २०१६-२०१७ या शैक्षणिक सत्रात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. ३१ जुलै २०१७ ला राजू डोनारकर यांच्याकडे आग लागली होती. तेव्हा दुर्गा नगर माध्यामिक शाळेचा विद्यार्थी अविनाश शेंडे याने धाडस दाखवून त्या घरातील इलेक्ट्रीक स्वीच व सिलेंडरचे कॉक बंद केले. आत अडकलेल्या ३ महिलांना सुखरूप बाहेर काढले. या त्याच्या धाडसाबद्दल त्याचा सत्कार महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रारंभी दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे सुरवात झाली. मान्यवरांचे स्वागत शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, सहायक शिक्षणाधिकारी कुसूम चापलेकर, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी, सौ. देशकर यांनी केले. यावेळी मनापातील शाळेच्या विद्यार्थांनी गणपती अथर्वशीर्ष व स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे संचालन मधु आव्हाड यांनी केले. आभार क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आयुक्तांनी केली प्रभाग दोनची पाहणी . नगरसेवकांनी दाखविलेल्या समस्याची घेतली गंभीर दखल



### स्वच्छता, रस्ते, अतिक्रमणासंदर्भात दिलेल्या निर्देशांचा घेणार १५ दिवसांनी आढावा

आशीनगर झोन अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्र. दोनमधील समस्यांची मनपा आयुक्त अश्विन मुदगल यांनी शनिवारी (ता.९) पाहणी केली. नगरसेवकांनी दाखविलेल्या समस्यांची गंभीर दखल घेत त्या तातडीने सोडविण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सदर समस्या सुटल्या की नाही याची पाहणी ते १५ दिवसांनी करणार आहेत.

आयुक्त अश्विन मुदगल यांच्यासोबत विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, झोन सभापती भाग्यश्री कानतोडे, नगरसेवक मनोज सांगोळे, दिनेश यादव, जितेंद्र घोडेस्वार, नगरसेविका भावना लोणारे स्नेहा निकोसे, मनपाचे अधीक्षक अभियंता दीपक सोनटक्के, कार्यकारी अभियंता राजेश भूतकर, सहायक आयुक्त विजय हुमणे, उपअभियंता विजय कडू, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, झोनल आरोग्य अधिकारी धनराज रंगारी, उपअभियंता अनिल नागदिवे, ओसीडब्ल्यूचे डेलीगेट रत्नाकर पंचभाई, संतोष लोणारे, राकेश निकोसे उपस्थित होते.

या दौऱ्यात आयुक्तांनी प्रामुख्याने गडर लाइन, त्यातून रस्त्यावर येणारे पाणी, अतिक्रमणामुळे चोक झालेल्या नाल्या, रस्त्यावरील खड्डे, वाहन पार्किंग मुळे बंद झालेले रस्ते, कार्यादेश निघूनही काम न सुरू झालेल्या सीमेंट रस्त्याचे लोकेशन, बंद असलेले पथदिवे आदींची पाहणी केली. ग्रामीण पोलिस मुख्यालयाजवळील पाटणकर चौक येथे मटन मार्केटचे अतिक्रमण आहे. त्यांनी नाल्या बंद केल्याने आजुबाजुच्या खाली प्लॉटवर पाणी साचले होते. अतिक्रमण तातडीने काढून पाण्याचा निचरा करण्याचे निर्देश आयुक्त मुदगल यांनी दिले. आर्मर टावर ते रिंग रोड सीमेंट रोडचे काम अद्याप सुरू झाले नाही. काम सुरू करण्यात तांत्रिक अडचण असेल तर तातडीने खड्डे बुजविण्याचे निर्देश त्यांनी दिले. काच फॅक्टरी, नारी बस स्टॉप, रमाई नगर डब्ल्यूसीएल रोड परिसरात उभ्या असणाऱ्या जड वाहनांमुळे नागरिकांना प्रचंड त्रास होतो. वाहन चालक अरेरावी करतात. यासंदर्भात नागरिकांनी तक्रार करताच आयुक्त अश्विन मुदगल यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनिद्वारे प्रकरणाचे गांभीर्य सांगितले. प्रारंभी संबंधित वाहन मालकांना समजावून सांगा. नसेल

समजत तर पोलिसात तक्रार करा, असे निर्देश श्री. मुदगल यांनी सहायक आयुक्त हुमणे यांना दिले. रमाई नगर ते डब्ल्यूसीएल रोड, कामगार नगर ते बुधवार बाजार रोड आदी ठिकाणी साचलेले पाणी जेसीबीद्वारे वळविण्याचे निर्देश त्यांनी झोनल आरोग्य अधिकारी रंगारी यांना दिले.

म्हाडा कॉलनी ते गुरुनानक कॉलेज तसेच कामगार नगर येथील रस्ता नागपूर सुधार प्रन्यासने काही महिन्यापूर्वीच तयार केला. मात्र त्या रस्त्यावर मोठमोठे खड्ढे झाले असल्याचे नगरसेवकांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. आयुक्त मुदगल यांनी नासुप्रचे श्री. गुज्जलवार यांना याबाबत भ्रमणध्वनिद्वारे माहिती देऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यासंदर्भात चर्चा केली. म्हाडा कॉलनीजवळील रस्त्यावर वारंवार पाणी साचत असल्यामुळे रस्ता खराब होतो. त्यावर स्थायी उपाय म्हणून ट्रंक लाइनचे काम तातडीने करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**खुल्या भूखंड मालकांना देणार नोटीस**

प्रभाग क्र. दोन मधील अनेक रिक्त भूखंडावर घाणीचे साम्राज्य आहे. अनेक दिवसांपासून पाणी साचले असल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका होऊ शकतो ही भीती व्यक्त करीत आयुक्त मुदगल यांनी अशा भूखंड मालकांना तातडीने नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. प्रतिसाद मिळाला नाही तर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा संकूल सज्ज



विदर्भातील पहिल्या सिंथेटिक ट्रॅकची महापौर नंदा जिचकार यांनी केली पहाणी

विभागीय क्रिडा स्पर्धेसाठी मानकापूर येथील क्रीडा संकूल सज्ज झाले आहे. नव्याने तयार करण्यात आलेल्या विदर्भातील पहिल्या अद्ययावत सिंथेटिक ट्रकची पाहणी महापौर नंदा जिचकार यांनी सोमवारी (ता.१) ला केली. यावेळी त्यांच्यासमवेत क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने, महाराष्ट्र शासनाचे क्रीडा विभागाचे उपसंचालक सुभाष रेवतकर, नागपूर ॲथलॅटिक्स असोसिएशनच्या सदस्या अर्चना किट्टेवार प्रामुख्याने उपस्थित होते.

विभागीय ॲथलॅटिक्स स्पर्धा १६,१७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी हा ट्रॅक तयार झालेला असून विदर्भातील पहिला सिंथेटिक अद्ययावत ट्रॅक तयार करण्यात आलेला आहे. हा ट्रॅक उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असून लवकरात लवकर याचे उद्घाटन करण्यात यावे, अशी विनंती रेवतकर यांनी महापौर नंदा जिचकार यांना केली. त्यावर महापौरांनी मुख्यमंत्र्यांशी बोलुन तारीख ठरवू, असे आश्वासन दिले. या ठिकाणी पॅव्हेलियनही तयार करण्यात येणार आहे. त्या बांधकामाचीदेखील पाहणी महापौरांनी केली.

**असा आहे नवा ॲथलेटिक्स ट्रॅक**

मानकापूर येथे नव्याने तयार करण्यात आलेला ॲथलेटिक्स ट्रॅक हा संपूर्ण सिंथेटिक असून पुण्याच्या बालेवाडी स्टेडियमच्या धरतीवर बनविण्यात आला आहे. येथे नव्या अद्ययावत विद्युत सुविधा असणार असून फ्लड लाईटची व्यवस्था असणार आहे. त्यामध्ये जमिनीत आत पाण्याचे स्प्रिंकल लावण्यात आले असून जेणेकरून पाणी ट्रॅकवर साचणार नाही याची देखील काळजी घेण्यात आली आहे.

# स्वच्छता आणि सुरक्षेला प्राधान्य द्या : महापौर नंदा जिचकार



दीक्षाभूमीवरील धम्मचक्र प्रवर्तन दिन तयारीसंदर्भात आढावा बैठक

नागपुरातील पवित्र दीक्षाभूमीवर होणारा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा नागपूरची ओळख जगभरात करून देणारा सोहळा आहे. या सोहळ्यात देशभरातून येणाऱ्या भाविकांची योग्य व्यवस्था करण्यासंदर्भात तत्पर राहावे. दीक्षाभूमी परिसराची स्वच्छता आणि सुरक्षेला प्राधान्य द्या. कुठलीही अनुचित घटना होणार नाही याची काळजी घ्या, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर होणाऱ्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या व्यवस्थेसंदर्भात आढावा घेण्यासाठी नागपूर महानगर पालिका मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या.

महापौर नंदा जिचकार यांच्यासह उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्ता पक्ष नेता संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले, दुर्बल घटक समितीचे सभापती महेंद्र धनविजय, भाजपच्या मनपातील प्रतोद दिव्या धुरडे, धरमपेठ झोन सभापती रुपा राय, स्थायी समितीचे सदस्य नगरसेवक मनोज सांगोळे, अतिरिक्त आयुक्त आर. झेड. सिद्दीकी, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, मुख्य अभियंता विजय बनगीरवार उपस्थित होते.

महापौर नंदा जिचकार, आयुक्त अश्विन मुदगल आणि पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांकडून दीक्षाभूमीवरील तयारीचा आढावा घेतला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यासाठी आय.टी.आय., जेल परिसर, माता कचेरी, दीक्षाभूमी यासह इतर ठिकाणी ७१० शौचालये, ७० स्नानगृहांची व्यवस्था करण्यात येत आहे. आयटीआय येथे सुमारे सात हजार चौरस फुटाचा पेंडाल टाकण्यात येत असून तेथे भाविकांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात येईल. आरोग्य विभागाची टीम २९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर पर्यंत २४ तास नागरिकांच्या सेवेत तत्पर असेल. २४ तास पाण्याची व्यवस्था करण्यासाठी काही ठिकाणी सुमारे २२० तात्पुरते नळ बसविण्यात येणार आहेत. ज्या-ज्या ठिकाणी भोजनदान आहे तेथे आणि प्याऊसाठी टँकरने पाणी पुरविण्यात येणार आहे. काही ठिकाणी नळ असलेल्या पीव्हीसीच्या टाक्यात उभारण्यात

येणार आहेत. दीक्षाभूमीपर्यंत येण्यासाठी नागरिकांनी मनपाची ‘आपली बस’ सेवा देणार आहेत. दीक्षाभूमी ते ड्रॅगन पॅलेस अशा सुमारे ५० ‘आपली बस’ भाविकांच्या सेवेत राहणार आहेत. दीक्षाभूमी परिसरात पूरक प्रकाश व्यवस्था करण्यात येणार आहे. सुमारे २२५ ते २५० फ्लड लाईट, १० जनरेटर आणि वेळोवेळी पोलिस विभागाकडून देण्यात येणाऱ्या सूचना भाविकांपर्यंत पोहोचण्यासाठी साऊंडची व्यवस्था प्रकाश विभागातर्फे करण्यात येणार आहे. सीसीटीव्हीची व्यवस्था यापूर्वीच झालेली आहे. दीक्षाभूमीकडे येणाऱ्या रस्त्यांवरील खड्डे आठ दिवसांत बुजविण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अग्निशमन विभाग पोलिसांच्या सहकार्याने आपत्ती निवारण कक्ष उभारणार आहे. पोर्टेबल फायर एक्स्टिंग्युशर आणि व्हॉलेंटियरसुद्धा ठिकठिकाणी कार्यरत राहणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी अधीक्षक अभियंता दीपक सोनटक्के, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर, कार्यकारी अभियंता (वाहतूक) डी.डी. जांभुळकर, कार्यकारी अभियंता (विद्युत) एस.बी. जैस्वाल, कार्यकारी अभियंता (हॉटमिक्स प्लान्ट) राजेश भूतकर, कार्यकारी अभियंता अनिरुद्ध चौगंजकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय जोशी, प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, विकास अभियंता सतीश नेरळ, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे, धंतोली झोनचे सहायक आयुक्त गणेश राठोड, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर आदी उपस्थित होते.

### स्वच्छतेची काळजी घ्या : संदीप जाधव

धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी तयार करण्यात येणाऱ्या तात्पुरत्या स्वरूपातील शौचालयातील मलब्याची कार्यक्रमानंतर तातडीने विल्हेवाट लावण्याची सूचना सत्तापक्ष नेते संदीप जाधव यांनी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना केली. पाऊस येण्याची शक्यता लक्षात घेता शाळा, खासगी जागा, शासकीय जागा, समाजभवन आदी पर्यायी जागांच्या व्यवस्थेचे नियोजन करण्यात यावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

### रस्ते तातडीने खुले करावे : आयुक्त अश्विन मुदगल

दीक्षाभूमीकडे येणाऱ्या सेंट्रल बाजार रोडवरील फुटपाथचे काम, महाराजबागकडून कल्पना बिल्डिंगकडून येणाऱ्या रस्त्याची देखभाल दुरुस्ती करून तातडीने हे रस्ते दुहेरी वाहतुकीसाठी खुले करावे. रहाटे कॉलनी ते अजनी स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यासंदर्भात मेट्रोला पत्र देऊन तातडीने त्याचे सपाटीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पावसाची शक्यता लक्षात घेऊन शासकीय इमारती, मनपाच्या आणि खासगी शाळांची माहिती घेऊन त्या ताब्यात घेण्याचे निर्देशही त्यांनी सहायक आयुक्तांना दिले. अतिरिक्त मोबाईल शौचालय, प्रत्येक दिवशी परिसराची स्वच्छता होईल त्याची काळजी, आरोग्य व्यवस्था तत्पर ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नागरिकांना सोयीचे व्हावे यासाठी दिशादर्शक फलक लावण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या हस्ते २२ ला कविवर्य सुरेश भट सभागृहाचे लोकार्पण




### नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा : महाराष्ट्रातील सर्वाधिक क्षमतेचे प्रेक्षागृह

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने रेशीमबाग येथे निर्मित वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले आणि नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे कविवर्य सुरेश भट सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण २२ सप्टेंबर रोजी दुपारी ४.१५ वाजता राष्ट्रपती मा. राम नाथ कोविंद यांच्या हस्ते होणार आहे.

कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल चे.विद्यासागर राव राहतील. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक, महामार्ग, जहाजबांधणी,जलस्त्रोत, नदी विकास व गंगा शुद्धीकरण मंत्री नितीन गडकरी, राज्याचे ऊर्जामंत्री आणि नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील.

### रसिकांसाठी पद्मश्री पद्मजा फेणाणी यांच्या कार्यक्रमाची भेट

कविवर्य सुरेश भट सभागृह लोकार्पण सोहळ्यानंतर नागपूर महानगरपालिकेच्या वतीने रसिकांना पहिलावहिला सांस्कृतिक नजराणा गायिका पद्मश्री पद्मजा फेणाणी यांच्या कार्यक्रमाच्या रूपाने मिळणार आहे. लोकार्पण सोहळ्यानंतर सायंकाळी ७ वाजता 'केव्हा तरी पहाटे...' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कविवर्य सुरेश भट यांच्या काव्य आणि गझल गायनाचा तसेच त्यांच्या खास पत्रांचा स्मृतिगंध गायिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर हया कार्यक्रमाच्या माध्यमातून उलगडतील. सदर कार्यक्रमासाठी समोरच्या रांगेतील १०० खुर्च्या राखीव राहतील. नागपूरकर रसिकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य असून रसिकांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहन महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त अश्विन मुदगल यांनी केले आहे.

### रेशीमबाग मैदानावर थेट प्रक्षेपण

कार्यक्रमस्थळ असलेल्या सभागृहाची आसन क्षमता दोन हजार असल्याने अनेक नागरिकांना सभागृह उद्घाटनाचे वेळी आत उपस्थित राहता येणार नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांना मा. राष्ट्रपतींच्या हस्ते लोकार्पण होणाऱ्या कविवर्य सुरेश भट सभागृहाचा लोकार्पण सोहळा अनुभवता यावा यासाठी रेशीमबाग मैदानावर एलईडीद्वारे थेट प्रक्षेपणाची व्यवस्था

करण्यात आली आहे. सुमारे तीन हजार नागरिकांना एकाच वेळी हा सोहळा अनुभवता येणार आहे. या व्यतिरिक्त नागपूर शहरातील चौकाचौकात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत लावण्यात आलेल्या व्हिडीओ स्क्रीनवरही (व्हीएमएस) कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण होणार आहे.

**फेसबुक लाईव्ह**

नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत फेसबुक पेजवरही लोकार्पण सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल. यामुळे नागपूरसह देशभरातील लोकांना हा सोहळा 'लाईव्ह' अनुभवता येणार आहे. फेसबुक लॉग इन करून @nmcngp अथवा Nagpur Municipal Corporation या अधिकृत पेजवर हा सोहळा बघता येईल. रेशीमबाग मैदानावरील थेट प्रक्षेपण, स्मार्ट सिटी स्क्रीनवरील थेट प्रक्षेपण आणि फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून नागपूरकरांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी आणि आयुक्त अश्विन मुदगल यांनी केले आहे.

**कविवर्य सुरेश भट सभागृह : वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना**

नागपूर शहरातील मध्य, पूर्व व दक्षिण नागपुरातील जनतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेले कविवर्य सुरेश भट सभागृह वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. १९८८ प्रेक्षकक्षमता असलेले हे सांस्कृतिक सभागृह महाराष्ट्रातील मनपाच्या मालकीचे सर्वाधिक प्रेक्षक क्षमता असलेले सभागृह आहे. दिवंगत कवी सुरेश भट हे नागपूरचा गौरव आहे. त्यांच्या नावाने तयार झालेल्या या सभागृहाच्या रूपाने त्यांच्या स्मृति चिरकाल राहणार आहेत.

सुमारे ७५ कोटी खर्चून तयार झालेल्या सभागृहाचे भूखंड क्षेत्रफळ १२२१५.९५ चौ.मी. इतके आहे.त्यापैकी ९७९४.०२ इतक्या चौ.मी. क्षेत्रफळावर सभागृहाचे बांधकाम आहे. इमारतीची उंची ३० मीटर आहे. सभागृह परिसरात तळघर व तळमजल्यावर सुमारे २०० कार, ६०० स्कूटर आणि ६०० सायकल इतकी मोठी वाहनतळ व्यवस्था आहे. व्ही.आय.पीं.साठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था आहे.

१९८८ प्रेक्षक क्षमता असलेल्या या प्रेक्षागृहात आयोजकांच्या सोयीनुसार कमीअधिक आसन व्यवस्था ठेवता येईल. कमीत कमी १३०० आसनक्षमता, १५७८ आणि १९८८ अशी आसनव्यवस्था ठेवता येईल.विशेष म्हणजे दिव्यांगांना स्वतंत्र जागा सभागृहात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सभागृहाती भव्य रंगमंच हे सभागृहाचे आकर्षण आहे. २५ मी. बाय १५ मी. असा एकूण ३७५ चौ.मी.क्षेत्रफळाचा रंगमंच लक्ष वेधून घेतो. इतकीच जागा बॅक स्टेजला आहे. रंगमंचाच्या बाजूला आठ ग्रीन रुम्स आणि दोन व्ही.आय.पी. रुम्स आहेत.

तळघरापासून ते तिसऱ्या मजल्यापर्यंत जाण्यासाठी प्रत्येकी २० व्यक्ती क्षमतेच्या दोन लिफ्ट आहेत.सभागृहाचा दर्शनी हॉल १२.१५ मीटर उंच व ३६.५० बाय ४१.१५ मी. आकाराचा आहे. संपूर्ण सभागृह आणि इमारत वातानुकुलित आहे. सभागृहात BOSE या जगविख्यात कंपनीची ध्वनियंत्रणा बसविण्यात आलेली आहे. सभागृहातील रंगमंचावरील प्रकाशव्यवस्था स्वयंचलित असून CANARA या नामांकित कंपनीद्वारे उभारण्यात आली आहे. सभागृह व परिसरात सर्वत्र

एलईडी दिवे लावण्यात आलेले आहेत.

प्रत्येक मजल्यावर स्त्री-पुरुषांकरिता स्वतंत्र प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक मजल्यावर ॲक्वा गार्डसह वॉटर कुलरचीही व्यवस्था उपलब्ध आहे.

विजेसाठी ८०० के.व्ही. क्षमतेचे सबस्टेशन उभारण्यात आले आहे. याशिवाय पर्यायी व्यवस्था म्हणून २५० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर संच उपलब्ध आहेत. सभागृहाच्या तळमजल्यावर उपाहारगृहाकरिता १४८५ चौ.मी. जागा उपलब्ध करण्यात आलेली आहे तसेच प्रत्येक मजल्यावर कॅफेटेरियाची व्यवस्था आहे.सभागृह परिसराचे सौंदर्य खुलविण्यासाठी ५०० चौ.मी. ची आकर्षक लॅण्डस्केपींग तयार करण्यात आलेली आहे. लॅन्डस्केपचा भाग वगळून ५२०० चौ.मी. क्षेत्रामध्ये सीमेंट ब्लॉक पेव्हींग करण्यात आले आहे. श्री.अशोक मोखा हे या प्रकल्पाचे वास्तुशास्त्रज्ञ असून वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ही वास्तू ओळखली जाणार आहे.

**अपारंपरिक ऊर्जेचा होणार वापर**

सभागृह व परिसरातील विद्युत वापराकरिता परंपरागत विद्युत व्यवस्थेचा वापर कमी व्हावा याकरिता सभागृहाच्या छतावर ७७० सोलर पॅनल उभारून २०० केव्हीए पीक (Peak) क्षमता असलेले अपारंपरिक ऊर्जेचे स्त्रोत उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे साधारणत: दर दिवशी ५० किलोवॅट ऊर्जा सोलर सिस्टीमद्वारे वापरून उर्वरीत वीज वितरण कंपनीच्या ग्रीड मध्ये नेट मीटरींगद्वारे उपलब्ध होईल. त्यामुळे सभागृहाचा विद्युत खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.

कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित पत्रपरिषदेत महापौर नंदा जिचकार यांनी ही माहिती दिली. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, स्थापत्य समिती सभापती संजय बंगाले, माजी महापौर प्रवीण दटके, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, भाजपच्या मनपातील प्रतोद दिव्या धुरडे, नगरसेवक निशांत गांधी, वास्तुविशारद अशोक मोखा उपस्थित होते.

# कविवर्य सुरेश भटांच्या गीत.गजलांचा स्मृतिगंध उलगडला



द्मजा फेणाणी (जोगळेकर) यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

कविवर्य सुरेश भट यांच्या स्मृतीना उजाळा देत पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध झालेत. निमित्त होते कविवर्य सुरेश भट सभागृहाच्या उद्घाटन सभारंभानंतर पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांच्या 'केव्हा तरी पहाटे...' या संगीत कार्यक्रमाचे. नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणा-या कविवर्य सुरेश भट सभागृहाचे शुक्रवारी (ता.२२) राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उद्घाटनानंतर पद्मश्री पद्मजा फेणाणी यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, दक्षिण नागपूरचे आमदार सुधाकर कोहळे, नागपूर पदवीधर मतदार संघाचे आमदार प्रा, अनिल सोले, रामटेकचे आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, महापौर नंदा जिचकार, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेंते तानाजी वनवे, आयुक्त अश्विन मुदगल, प्रसिद्घ वास्तुविशारद अशोक मोखा उपस्थित होते. यावेळी पद्मजा फेणाणी यांनी सुरेश भटांच्या आठवणींना उजाळा देत एकाहून एक सरस गझल आणि गाणी गायली. यात दुखाःच्या वाटेवर गाव तुझे, विसरून जा, सजन दारी उभा, सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या, सुहास्य तुझे मनासी मोही, केव्हा तरी पहाटे, मलमली तारूण्य माझे यासारखे अनेक गाणी त्यांनी यावेळी सादर केलीत. या गाण्यांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. पद्मजा फेणाणी जोगळेकर यांना तबल्यावर त्रिगुण पटवर्धन, सिंथेसायझरवर मंदार पारखी, व्हॉयोलीनवर महेश खानोलकर, तालवाद्यावर नागेश भोसेकर, संवादिनीवर सोनाली बोरकर यांनी साथ संगत केली. याप्रसंगी भट सभागृहाच्या निर्माणाकरिता योगदान करणा-या अभियंत्यांचा सत्कार केन्द्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला. आयुक्त अश्विन मुदगल, माजी मनपा आयुक्त शाम वर्धने, माजी मुख्य अभियंता उल्हास देबडवार, प्रसिद्ध वास्तुविशारद अशोक मोखा, नगर अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जैस्वाल, उपअभियंता चंद्रकात गभने, नियाजी, मानकर, रूद्राकार, उमेश मगने, कुणाल भिसीकर, सुरेश पटेल, नीलेश काटे, शंतनु इंगळे यांचा सत्कारमूर्तिंनमधे समावेश होता. प्रारंभी पद्मजा फेणाणी यांचा नितीन गडकरी यांनी मानचिन्ह, शाल देऊन सत्कार केला. कविवर्य सुरेश भट सभागृहातील या पहिल्या कार्यक्रमासाठी नागपूरकरानी एकच गर्दी केली होती. दोन हजार आसन क्षमतेचे सभागृह 'हाउसफुल' झाले होते.

# इक्विसिटीतर्फे आपत्ती व्यस्थापन कार्यशाळा



युरोपियन युनिअनच्या सहयोगाने नागपूर महानगर पालिकेकरीता अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे संचालित इक्विसिटीतर्फे महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन शनिवारी (दि.23) राष्ट्रीय नागरी सुरक्षा महाविद्यालय येथे करण्यात आले. कार्यशाळेचे उदघाटन उपायुक्त रवींद्र देवतळे यांच्या हस्ते झाले. प्रामुख्याने राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे संचालक जी. एस. सैनी, उपसंचालक राजेश चौधरी, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्थेचे विभागीय संचालक जयंत पाठक उपस्थित होते.

कार्यशाळेतील "आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत" विविध आपत्ती परिस्थितीबद्दल माहिती घेऊन आपली जबाबदारी आणि कर्तव्य सहज पद्धतीने पूर्ण करण्याबद्दल माहिती देण्यात आली. यामध्ये नागपुरातील विविध याआपत्तीबद्दल अभ्यासपूर्ण सादरीकरण करण्यात आले. वातावरण आणि हवामानानुसार विविध आपत्ती अभ्यासिका सादर करण्यात आली. पहिल्या सत्रात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सौरभ कुमार यांनी आपत्ती व्यवस्थापन या विषयावर माहिती दिली. दुसऱ्यासत्रात आपत्ती तयारी या विषयावर डॉ. अरुणा गजभिये यांनी प्रकाश टाकला. तिसऱ्या सत्रात राष्ट्रीय नागरी सुरक्षा महाविद्यालयाचे उपसंचालक आर. एस. चौधरी यांनी इमरजंसी रिस्पॉन्स विषयावर माहिती दिली. कार्यशाळेत राष्ट्रीय नागरी सुरक्षा महाविद्यालयाचे संचालक जी. एस. सैनी यांनी जबाबदारी आणि कार्यपद्धत या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे प्रास्ताविक आणि संचालन जयंत पाठक यांनी केले. यावेळी अग्निशमन, आरोग्य, पाणी व्यवस्थापन व जनसंपर्क विभागाच्या अधिका-यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी मनपा कटिबद्ध : महापौर नंदा जिचकार



### गणित व विज्ञान विषयातील शिक्षकांसाठी कार्यशाळा

मनपातील शाळांचा आणि पर्यायाने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी मनपा कटिबद्ध आहे. यासाठी शिक्षण विभागातर्फे विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. शिक्षण विभागाच्या या अभिनव उपक्रमात आपण नेहमीच सोबत राहू, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.

मनपाच्या शिक्षण विभागातर्फे महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवन येथे गणित व विज्ञान विषयांच्या शिक्षकांसाठी सोमवारी (ता. २५) एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. मंचावर शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, शिक्षण समिती सदस्य राजेंद्र सोनकुसरे, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार आणि कार्यशाळेतील प्रमुख वक्ते सेंटर फॉर सायंटिफिक लर्निंगचे संचालक डॉ. विवेक वाघ उपस्थित होते. यावेळी बोलताना महापौर नंदा जिचकार पुढे म्हणाल्या, शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या आवडीचे बनायला हवे. हसतखेळत शिक्षण दिले तर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होते. यासाठी शिक्षकांचे मनोबल उंचावणे आणि त्यांच्या बदलत्या शिक्षण पद्धतीप्रमाणे प्रशिक्षण देणेही गरजेचे असते. याच उदात्त हेतूने शिक्षण विभागाच्या वतीने आता प्रत्येक विषयांसाठी अशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत असून यासाठी आपले संपूर्ण सहकार्य असल्याचे सांगितले.

शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे म्हणाले, मनपाचा शिक्षण विभाग आता कात टाकत आहे. कुठल्याही विद्यार्थ्यांच्या तुलनेत मनपाचे शिक्षक आणि विद्यार्थी कमी राहू नये यासाठी त्यांचे 'अपग्रेडेशन' वेळोवेळी करण्याचा आम्ही आता संकल्प केला आहे. हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठीच अशा कार्यशाळा सुरू केल्या आहेत. यानंतर झोनस्तरावर अशा कार्यशाळा घेण्याची आखणी करीत असून या माध्यमातून मनपाच्या शिक्षण विभागाला एका वेगळ्या उंचीवर नेण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.

शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका विषद केली. त्यानंतर प्रमुख वक्ते डॉ. विवेक वाघ यांनी त्यांच्या प्रकल्पाविषयी माहिती देत गणित आणि विज्ञान विषयांशी संबंधित अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. संवादाच्या माध्यमातून त्यांनी उपस्थित शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये या विषयांविषयीची गोडी कशी

निर्माण करायची, याबाबत विस्तृत विवेचन केले. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती गीता दांडेकर यांनी केले. आभार शाळा निरीक्षक प्रीती बंडेवार यांनी मानले. कार्यक्रमाला सहायक शिक्षणाधिकारी कुसुम चाफलेकर यांच्यासह सर्व शाळा निरीक्षक, गणित आणि विज्ञान विषयाचे शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.

# दुर्बल घटकातील नागरिकांसाठी सदैव कटीबद्ध रहा . महापौर नंदा जिचकार



दुर्बल घटक समिती सभापती महेंद्र धनविजय यांचा पदग्रहण सोहळा

शहरातील दुर्बल घटकांसाठी काम करण्यासाठी महानगरपालिकेची दुर्बल घटक समिती तयार करण्यात आली आहे. दुर्बल घटकातील नागरिकांसाठी सदैव कटीबद्ध रहा, असा सल्ला महापौर नंदा जिचकार यांनी दिला आहे.नागपूर महानगरपालिकेच्या दुर्बल घटक समिती सभापती महेंद्र धनविजय यांच्या पदग्रहण समरोहाप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उत्तर नागपूरचे आमदार डॉ.मिलींद माने, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, प्रतोद दिव्या धुरडे, माजी महापौर प्रवीण दटके, विक्की कुकरेजा, भाजपाचे संघटन मंत्री भोजराज डुंबे प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, दुर्बल घटक समिती ही मनपामधील एक प्रमुख समिती आहे. या समितीला विशेष महत्व आहे. महेंद्र धनविजय ही समिती सक्षमरित्या सांभाळतील असा मला विश्वास आहे. या समितीअंतर्गत येणा-या निधीचा विनियोग योग्य पद्धतीने झाला तर येणा-या समस्येवर आपल्याला मात करता येईल असे ते यावेळी बोलताना म्हणाल्या.

यावेळी आमदार मिलींद माने यांनी महेंद्र धनविजय यांना शुभेच्छा दिल्या. काही वर्षापूर्वी मी ही या समितीचा सभापती होतो. पण त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. आता वेगळी आहे. तरिही महेंद्र धनविजय हे दिलेली जबाबदारी समर्थपणे सांभाळतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रारंभी मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. महापौरांनी नवनिर्वाचित सभापती महेंद्र धनविजय यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, तर आभारप्रदर्शन प्रदीप खर्नडवीस यांनी केले. कार्यक्रमाला नगरसेविका उषा पायलट, शीतल कामडे, सुषमा चौधरी, स्नेहल बिहारे, वर्षा ठाकरे, श्रद्धा पाठक, सुमेधा देशपांडे, कल्पना कुंभलकर, भाग्यश्री कानतोडे, स्नेहा निकोसे, शिल्पा धोटे, शकुंतला पारवे, उज्ज्वला शर्मा, निरंजना पाटील, मंथरानी, नगरसेवक मनोज सांगोळे, पिंटु झलके, विक्की कुकरेजा, प्रवीण भिसीकर, जीतेंद्र घोडेस्वार, धर्मपाल मेश्राम, अनिल गेंडरे, सुनील हिरणवार, मोहम्मद जमाल, माजी नगरसेवक विजय केवलरामानी, कार्यकारी अभियंता डी.डी. जांभूळकर, आय.एम. चे अध्यक्ष डॉ.रूघवानी उपस्थित होते.